REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# भारतातील लोकसंख्यावाढ व सरकारचे नियंत्रणासाठी धोरण

प्रा.देशमुख शेषनारायण किसनराव
माऊली महाविद्यालय,वडाळा

**प्रस्तावना -**



आर्थिक विकासासाठी राष्ट्रीय उत्पन्नवाढीची गरज आहे.तर राष्ट्रीय उत्पन्न वाढीसाठी भुमी,श्रम,भांडवल आणि संयोजक यांची गरज असते.वाढणा-या लोकसंख्येतून श्रम व संयोजक हे दोन घटक उपलब्ध होतात म्हणून वाढणारी लोकसंख्या नेहमीच अपकारक नाही तर उपकारक ठरू शकते म्हणजे लोकसंख्या नियंत्रण धोरणाच्या माध्यमांतून लोकसंख्येचा पर्याप्त आकडा गाठता येतो.

भारत हा विकसनशील देश असल्यामुळे लोकसंख्येच्या विस्फोटाच्या स्थितीत आहे.भारतात १९२१ हे लोकसंख्येचे महाविभाजन वर्ष मानले जाते. ्या अगोदर लोकसंख्या वाढीकडे प्रश्न म्हणून पाहण्याची गरज नव्हती भारतात १८८१ ला पहिली रितसर जणगणना झाल्याचे दिसून येते.१९२१ ते १९५१ या दरम्यान लोकसंख्या वाढल्याचे दिसून येते.

भारतामध्ये अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये जे अनेक अडथळे आहेत.त्यामध्ये लोकसंख्या वाढ हा फार मोठा अडथळा आहे म्हणून स्वातंत्र्यानंतर सरकारने.सर्वप्रथम १९५२ मध्ये कुटुंबनियोजन कार्यक्रम १९७७,कुटुंबकल्याण कार्यक्रम, व ९० च्या दशकापासून महिला सबलीकरणावर भर दिलेला दिसतो.तर २००० साली दिर्घकालीन लोकसंख्या धोरण जाहीर करून सरकारने लोकसंख्या नियंत्रणाच्या प्रयत्न केला आहे.विकास आणि लोकसंख्या यांचा खुप जवळचा संबंध आहे म्हणून लोकसंख्येचा आकार पर्याप्त ठेवणे अत्यंत गरजेचे आहे हा आकार पर्याप्त ठेवण्यासाठी सरकारने प्रत्येक पंचवार्षिक योजना काळात मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करून व धोरणात्मक निर्णय घेऊन लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाचा उद्देश -**

१.भारतातील लोकसंख्या नियंत्रणाचा अभ्यास करणे
२.लोकसंख्येची सध्यस्थिती जाणून घेणे
३.लोकसंख्या नियंत्रणाच्या उपयांचा आढावा घेणे
४.लोकसंख्या नियंत्रणासाठी धोरणात्मक उपाय सुचवणे.

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत संशोधन दुय्यम साधन सामुग्रीवर आधारीत आहे.संशोधनासाठी विविध पुस्तके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, जनगणना अहवाल इ चा वापर केला आहे.

**लोकसंख्या वाढीचा आढावा -**

देशाची लोकसंख्या ही उपलब्ध साधन सामुग्रीशी मिळती जुळती ठेवण्यासाठी सरकारने लोकसंख्येचा आकार रचना व वितरण यामध्ये जाणीवपुर्वक बदल करण्याचे धोरण म्हणजे लोकसंख्या धोरण होय.१९२० सालापर्यत लोकसंख्या नियंत्रणाचा प्रश्न भारतीय अर्थव्यवस्थेसमोर नव्हता परंतु १९२१ ते १९५१ पर्यंत लोकसंख्या हळुहळु वाढायला सुरूवात झाली १९५१ ते १९८१ पर्यंत भारताची लोकसंख्या वेगाने वाढली आहे.भारतातील बेरोजगारी,दारिद्रय,भाववाढ या गोष्टी वाढत्या लोकसंख्येच्या निर्देशक आहेत.म्हणून सरकारने लोकसंख्या नियंत्रणासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते.सन १९०१ मध्ये भारताची लोकसंख्या २३.६ को होती ती वाढून १९५१ मध्ये ३६.५१ को. एवढी झाली.तर २०११ च्या जणगणनेनुसार १२३ को.एवढी आहे.सध्या भारताची लोकसंख्या १३० को. पेक्षा जास्त आहे.

**भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे-**

१.अल्पवयीन विवाह

२.बहुविवाह पध्दत
३.उष्ण हवामान
४.सार्वजीक विवाहाची पध्दत
५.साक्षरतेचे कमी प्रमाण
६.अंधश्रध्दा आणि रूढी परंपरा
७.मोठ्या प्रमाणावरील दारिद्रय
८.जास्त जननदर
९.करमणूक साधनांचा अभाव
१०.निकृष्ठ राहणीमान
११.विधवांचे पुनर्विवाह
१२.कुटुंब नियोजनाला अपूरा प्रतिसाद

**स्वातंत्र्यपुर्व काळातील धोरण -**

इंग्रजांना मनुष्यबळाची गरज असल्यामुळे त्यांनी लोकसंख्या नियंत्रणाकडे दुर्लक्ष केले परंतु आपणास मद्रास विद्यापीठ,केरळ विद्यापीठ यामध्ये संख्या शिक्षणाचा उल्लेख आढळतो.भारतात १९४० मध्ये राधाकमल मुखर्जी समिती, १९४३ मध्ये जोसेफ भोरे समिती, स्थापन करून लोकसंख्या नियंत्रणा संदर्भात विचार झाला.महात्मा गांधीनी सुध्दा लोकसंख्या नियंत्रणाबद्दल गरज व्यक्त केली होती.

**लोकसंख्या संख्यात्मक नियंत्रण आणि गुणात्मक विकास -**

भारतातील लोकसंख्या अधिक असल्याने ती नियंत्रणात आणून पर्याप्त करणे गरजेचे आहे.परंतु त्याच बरोबर अस्तित्वावरील लोकसंख्या,शिक्षण,आरोग्य आणि चांगला आहार देऊन सक्षम मनुष्यबळ तयार करणे म्हणजेच गुणात्मक विकास करणे हे सुध्दा लोकसंख्या पर्याप्त पातळीवर आणण्याचा एक भाग आहे.यामध्ये सरासरी जीवनमान सुधारणे व्यावसायिक शिक्षण देणे,कर्त्यालोकसंख्येचे प्रमाण वाढवणे इ.उपाय करून पर्याप्त लोकसंख्येचा बिंदू वरील पातळीवर नेता येतो म्हणून सरकारने गुणात्मक विकासावर अनेक धोरणात्मक निर्णय घेऊन भर दिला आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील सरकारचे लोकसंख्या नियंत्रणातील धोरणात्मक उपाय -**

इंग्रजांनी स्वातंत्र्यपुर्व काळात लोकसंख्या नियंत्रणाचे विशेष प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत.परंतु स्वातंत्र्योत्तर काळात नियोजनाला सुरूवात झाल्यानंतर सरकारने लोकसंख्या नियंत्रणाचे अनेक प्रयत्न केले.

**अ) कुटुंब नियोजन कार्यक्रम -** सरकारने जननदरात घट घडवून आणणे,लोकसंख्या गुणवत्ता सुधारणे,लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे अशा उद्दिष्टासह कुटुंब नियोजन कार्यक्रम सुरू केला .सरकारने १९५२ मध्ये हा कार्यक्रम सुरू केला यामध्ये पुढील प्रमाणे अनेक तरतुदी करण्यात आल्या.
१.संतती नियमनाच्या साधनांचा प्रचार प्रसार करणे.
२.वैध्यकीय सोयी सुविधा वाढवल्या.
३.प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या वाढविली.
४.१९७२ मध्ये गर्भपाताला कायदेशीर मान्यता दिली.
५.साक्षरता वाढवण्यासाठी प्रयत्न केला.
६.विवाहाची कायदेशीर मर्यादा वाढवण्यात आली.
७.कुटुंब नियोजनाचे प्रशिक्षण देण्याकरिता प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आल्या.
८.कुटुंब नियोजन चिकित्सालयाची संख्या वाढवण्यावर भर देण्यात आला.
९.संतती नियमनासाठी प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आली.

**आणीबाणीचा कालखंड -**

सन १९७५ ते १९७७ या काळात आणीबाणी होती या दरम्यान काळात संतती नियमणाची बरीच उद्दिष्टे साध्य करण्यात आली या दोन वर्षामध्ये संतती नियमन,निर्बिजिकरण शस्त्रक्रिया या मध्ये प्रचंड सक्ती करण्यात आली.त्यामुळे या कार्यक्रमाची लोकप्रियता प्रचंड घटली लोकांच्या मनात या कार्यक्रमाबद्दल व्देश,दहशत व भीती निर्माण झाली.

**ब) कुटुंब कल्याण कार्यक्रम -** १९७७ मध्ये आणीबाणी नंतर जनता सरकार सत्तेत आले त्यांनी या कार्.क्रमाचे नाव बदलून कुटुंब कल्याण कार्यक्रम असे नाव दिले यामध्ये पुढील तरतुदी करण्यात आल्या.
१.कल्याणकारी संकल्पेनवर भर देण्यात आला.
२.माता आणि बालक यांच्या आरोग्यावर भर देण्यात आला.
३.जन आरोग्य रक्षक योजना सूरू करण्यात आली.
४.१९८३ मध्ये राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहीर केले.
५.सन २००० मध्ये नवीन लोकसंख्या धोरण जाहीर करण्यात आले.

**क) महिला सबलीकरण धोरण -**
१.महिला शिक्षणावर भर देण्यात आला.
२.बालक व मातृत्व सेवावर भर देण्यात आला.
३.महिलांचे आरोग्य शिक्षण रोजगार यावर भर देण्यात आला.
४.२००१ मध्ये महिला सबलीकरणासाठी राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले.
५.१० व्या योजनेत महिलांच्या सशक्तीकरणासाठी त्रिसुत्री चा स्विकार करण्यात आला.

**अ) महिलांचे सामाजिक सबलीकरण -** या मध्ये स्त्रियांच्या विकासाठी सकारात्मक धोरणे व विकासात्मक कार्यक्रम सुरू केले.यामध्ये महिलांच्या क्षमतांवर भर देण्यात आला.तसेच महिलांना सहज व समान दर्जा, संधी उपलब्ध करून देण्यात आली.सर्व पातळीवर स्त्रीयांसाठी मोफत व सहज शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले.महिलांच्या व्यावसायिक शिक्षणावर भर देण्यात आला.
**ब) महिलांचे आर्थिक सबलीकरण -** यामध्ये दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमाअंतर्गत बचत गटांच्या माध्यामातुन संघटित केले.महिलांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती सुधारण्यासाठी लक्ष दिले. त्याचबरोबर रोजगार प्रशिक्षण, फळबाग, कुकुटपालन, मत्यपालन यामध्ये महिलांना प्राधान्य व सवलती देण्यात आल्या.महिलांना सुक्ष्म वित्तपुरवठा करण्यात आला तसेच नोकरीमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्यात आले..
**क) लिंग न्याय -** स्त्रिया व मुलींबाबत सर्व विभेदाचे निर्मुलन करण्यावर भर देण्यात आला.स्त्रियांना पुरूषांच्या बोरबरीने राजकीय,आर्थिक,सामाजिक क्षेत्रात स्थान देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**नवीन लोकसंख्या धोरण २०००** - १५ फेब्रुवारी २००० मध्ये सरकारने दिर्घकालीन असे नवीन राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहीर केले.यामध्ये दोन मुलांचे कुटुंब व २०४६ पर्यत लोकसंख्या स्थिर करणे हे मुख्य उद्दिष्ट होते यामध्ये सरकारने १)यामध्ये अल्प मुदतीमध्ये कुटुंब नियोजन साधणे पुरवणे स्त्रियांच्या आरोग्यावर भर दिला तसेच संतती नियमनाच्या मार्गदर्शनावर भर दिला. २) मध्यम उद्दिष्टामध्ये जन्मदर २.६ वरून जन्मदर २.१ करण्याचे उद्दिष्ट १० वर्षात पुर्ण करण्याचे ठरले.३) २०४६ पर्यंत दोन मुलांचे कुटुंब व लोकसंख्या स्थिर ठेवण्याचे उद्दिष्ट होते.अशा प्रकारे सरकारने या लोकसंख्या धोरणातून लोकसंख्या नियंत्रणासाठी अनेक उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवुन लोकसंख्या नियंत्रण केले आहे.

**बिगर सरकारी संस्था व लोकसंख्या नियंत्रण -**

या NGO संस्थाच्या माध्यमातून लोकसंख्या नियंत्रणासाठी अनेक प्रयत्न केले जातात.यामध्ये लहान कुटुंब मुलगा,मुलगी समानता,स्त्री साक्षरतेवर भर,मुलींच्या विवाहाचे वय वाढविणे व १८ वर्षानंतर लग्न करण्यासाठी प्रचार करणे,लहान मुलांची काळजी,दोन मुलांतील अंतर इ अनेक गोष्टीसंदर्भात ग्रामीण भागामध्ये याचा पथनाट्य,लघुपट,प्रत्यक्ष समजावणे इ माध्यमातुन अनेक उपाय करून NGO ची खुप मदत लोकसंख्या नियंत्रणामध्ये होते.

**पंचवार्षिक योजना व लोकसंख्या नियंत्रण -**

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये खर्च हा फक्त ६५ लाख रू एवढाच होता. त्यावरील तो १० व्या योजनेत सरकारने २५१२५ को रू पर्यंत वाढवला आहे.या पंचवार्षिक योजना काळामध्ये सरकारने अनेक धोरणात्मक उपाय योजना करून जन्मदर व मृत्यदर मोठ्या प्रमाणावर घट करण्यात यश मिळवले आहे.

**निष्कर्ष -**

१.सरकारने सुरूवातीपासून लोकसंख्या नियंत्रणासाठी विविध पातळीवर प्रयत्न केलेले आहेत.
२.१९८० नंतर लोकसंख्या नियंत्रणामध्ये काही अंशी यश मिळाल्याचे दिसून येते.
३.महिला सबलीकरणानंतर लोकसंख्या नियंत्रणाचा वेग वाढला
४.२००० च्या लोकसंख्या घोरणामुळे लोकसंख्या नियंत्रणाला यश आल्याचे दिसते.
५.खर्चाची तरतुद लोकसंख्येच्या तुलनेत खुप कमी आहे.
६.कुटुंब नियोजनाच्या तसेच लोकसंख्या नियंत्रणाच्या तरतुदीमध्ये काटेकोर अंमलबजावणी होत नाही.
७.लोकसंख्या नियंत्रणासाठी अनेक कार्यक्रमाच्या अंमलबजावणी मध्ये सरकारी अनास्था दिसुन येते.

## शिफारशी -

लोकसंख्या नियंत्रणासाठी सरकारी पातळीवर विविध गोष्टी करणे गरजेचे आहे.यामध्ये
**१**.या कार्यक्रमासाठीची आर्थिक तरतुद वाढविणे  गरजेचे आहे.
**२**.लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रम लोकाभिमुख झाला पाहिजे.
**३**.१००%  साक्षरतेसाठी प्रयत्न केले पाहिजेत.
**४**.सरकार बरोबरच NGO चा सहभाग वाढला पाहिजे.
**५**.कायदेशीर तरतुदीमध्ये वाढ होऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे.

## सारांश -

सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात दरहजारी ४८ वरून जन्मदर १८ पर्यंत कमी करून लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रमाला मोठे यश मिळवुन दिले आहे.तरीही आपल्याला लोकसंख्या नियंत्रणाला म्हणावे असे यश आले नाही.परंतु लोकसंख्येचे संख्यात्मक नियंत्रण व गुणात्मक विकास याच्या जोरावर भारत लवकरच महासत्ता होईल.

## संदर्भग्रंथ सुची -

१.भारतीय अर्थव्यवस्था,देसाई,भालेराव,निराली प्रकाशन
२.Demography -  Jhingan,Bhatt & Desai.
३. Demography-Peter R cox.
४.Census of India -Govt of India Report.
५.लोकसंख्या - अहिरराव
६.भारतीय अर्थव्यवस्था-भोसले काटे
७.लोकसंख्याशास्त्र भोसले काटे
८.https://en.m.wikipedia.org.
९.https://books.google.co.in.